




दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ








dainiklokaarambh@gmail.com LOK AARAMBH संपादक:राहुल मारोतीराव वाईकर कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | शनिवार १९ एप्रिल २०२५ | अंक १२८ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु




# जर कोणाला इंग्रजी शिकायचं असेल तर त्याला इंग्रजी शिकता येईल - देवेंद्र फडणवीस

## अन्य भाषाही शिकायच्या असतील तर कोणतीही भाषा शिकण्यापासून कोणालाही मनाई

### कोणतीही भाषा शिकण्यापासून कोणालाही मनाई नाही

“नवीन शिक्षा निती ही यापूर्वीच आपण लागू केलेली आहे. आपण यात कोणतेही नवीन निर्णय घेतलेले नाही. महाराष्ट्रात मराठी प्रत्येकाला आलंच पाहिजे हा आपला आग्रह आहे. त्यासोबतच देशात एक संपर्क सूत्र तयार करण्यासाठी हिंदी ही एक भाषा आहे. यामुळे देशात संपर्क सूत्र तयार होऊ शकते. त्यामुळे लोकांनी हिंदी भाषादेखील शिकायला हवी यासाठी हा प्रयत्न आहे. पण जर कोणाला इंग्रजी शिकायचं असेल तर त्याला इंग्रजी शिकता येईल किंवा अन्य भाषाही शिकायच्या असतील तर कोणतीही भाषा शिकण्यापासून कोणालाही मनाई नाही”. असे देवेंद्र फडणवीसांनी म्हटले.

### नव्या शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी कधीपासून

दरम्यान राज्यात यंदाच्या शैक्षणिक वर्षापासून नव्या शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी करण्यात आली आहे. ही अंमलबजावणी टप्प्याटप्प्याने करण्यात येणार आहे. येत्या जूनपासून या धोरणाची अंमलबजावणी केली जाणार आहे. त्यानुसार राज्यात इयत्ता पहिलीपासून हिंदी शिकण्याच्या अनिवार्यतेवर शिक्कामोर्तब करण्यात येत आहे. नव्या शैक्षणिक धोरणानुसार मराठी आणि इंग्रजी माध्यमांच्या शाळांतील पहिली ते पाचवीच्या विद्यार्थ्यांना मराठी आणि इंग्रजीसह हिंदी ही तृतीय भाषा शिकवली जाईल. तर अन्य माध्यमांच्या शाळांमध्ये पहिली ते पाचवीसाठी माध्यम भाषा, मराठी आणि इंग्रजी अशा तीन भाषा असणार आहेत.

महाराष्ट्रात यंदाच्या वर्षापासून नवीन शैक्षणिक धोरण लागू करण्यात येणार आहे. या नवीन शैक्षणिक धोरणानुसार सर्व शाळांमध्ये हिंदी भाषेची सक्ती करण्यात आली. या नव्या शैक्षणिक धोरणानुसार मराठी आणि इंग्रजी माध्यमांच्या शाळांतील पहिली ते पाचवीच्या विद्यार्थ्यांना मराठी आणि इंग्रजीसह हिंदी ही तृतीय भाषा शिकवली जाणार आहे. आता यावरुन मनसे चांगलीच आक्रमक झाली आहे. ‘राज्य शालेय अभ्यासक्रम आराखडा २०२४ नुसार महाराष्ट्रात पहिलीपासूनच हिंदी ही भाषा अनिवार्य करण्यात आली आहे. मी स्वच्छ शब्दांत सांगतो की ही सक्ती महाराष्ट्र नवनिर्माण सेना खपवून घेणार नाही,’ असा इशारा राज ठाकरेंनी दिला आहे. आता यावर राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रतिक्रिया दिली याहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नुकतंच प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. यावेळी त्यांना नवीन शैक्षणिक धोरणाबाबत विचारणा करण्यात आली. त्याबद्दल त्यांनी नव्या शैक्षणिक धोरणाबाबत सविस्तरपणे भूमिका मांडली. महाराष्ट्रात मराठी प्रत्येकाला आलंच पाहिजे हा आपला आग्रह आहे.

# अर्धांगवायू झाला नसून, दीड महिन्यापूर्वी झालेला बेल पॅल्सी हा आजार -धनंजय मुंडे

राज्याचे माजी मंत्री आणि राष्ट्रवादीचे नेते धनंजय मुंडे यांना अर्धांगवायूचा झटका आल्याचं सांगितलं जात होतं. तसेच त्यांच्यासाठी प्रार्थना करण्याचं आवाहनही केलं जात होतं. त्यामुळे धनंजय मुंडे यांच्या समर्थकांमध्ये चलबिचल निर्माण झाली होती. मात्र, धनंजय मुंडे यांनी स्वत:च आपल्या आजारपणाची माहिती दिली आहे. आपल्याला अर्धांगवायूचा झटका आला नसल्याचं मुंडे यांनी स्पष्ट केलं आहे. मुंडे यांनी एक ट्विट करून ही माहिती दिली आहे.

आमचे सहकारी, सहकारमंत्री बाबासाहेब पाटील यांनी केलेल्या एका विधानावरून मला अर्धांगवायू झाल्याचे वृत्त काही वाहिन्यांवर प्रसारित केले जात आहे. मुळात मला बेल्स पाल्सी हा आजार दीड महिन्यांपूर्वी झालेला असून त्याचा परिणाम चेहऱ्यावर झाल्याने अजूनही मला बोलायला त्रास होतो, असं



माजी मंत्री धनंजय मुंडे यांनी म्हटलं आहे.नव्याने कोणताही आजार नाही बाबासाहेब पाटील यांची आणि माझी दोन दिवसांपूर्वी एका बैठकीत भेट झाली होती. त्यांनी माझ्याबद्दल काळजी व्यक्त केली त्याबद्दल आभार. मात्र मला झालेला आजार हा अर्धांगवायू नसून बेल्स पाल्सी आहे आणि त्याचा तसेच इतर काही वैद्यकीय बाबींचा त्रास अजूनही होतो असून बोलायला त्रास आहे. मात्र नव्याने मला कोणताही आजार झालेला नाही, असं धनंजय मुंडे यांनी स्पष्ट केलं होतं.

आमचे सहकारी, सहकारमंत्री श्री बाबासाहेब पाटील यांनी केलेल्या एका विधानावरून मला अर्धांगवायू झाल्याचे वृत्त काही वाहिन्यांवर प्रसारित केले जात आहे. मुळात मला बेल्स पाल्सी हा आजार दीड महिन्यांपूर्वी झालेला असून त्याचा परिणाम चेहऱ्यावर झाल्याने अजूनही मला बोलायला त्रास होतो.

# जनतेच्या कष्टाच्या पैशांमधून: दमानियांचा तटकरेंवर निशाणा

ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी पुन्हा एकदा ट्विट करत राष्ट्रवादी अजित पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला आहे, तसेच त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर देखील निशाणा साधला आहे. जनतेच्या कष्टाने कमवलेल्या करायच्या पैशातून तटकरेंसाठी खास हेलिपॅड? ती पण चार चार हेलिपॅड? अमित शाह यांची भेट वैयक्तिक होती. तो भार सरकारी तिजोरीवर कशासाठी? असा सवाल दमानिया यांनी उपस्थित केला आहे.

नेमकं काय म्हणाल्या दमानिया? अंजली दमानिया यांनी सुनील तटकरे यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला आहे. ‘जनतेच्या कष्टाने कमवलेल्या करायच्या पैशातून तटकरेंसाठी खास HELIPAD? ती पण चार चार Helipad? अमित शाह भेट वैयक्तिक होती. तो भार सरकारी तिजोरीवर कशासाठी? अमित शाह यांना जेवायला घालायचय, खुशाल घाला. सोन्याच्या ताटात घालायचंय तरी घाला. ते आमच्या कष्टाच्या पैशाने कशासाठी? तटकरेंच्या अफाट कंपन्या आहेत ना ? मग त्यांनी वैयक्तिक खर्च करावा देवेंद्र फडणवीसांचे पुनःश्च अभिनंदन. सिंचन घोटाळा विसरून नवीन सरकार मधे खूपच चांगला ताळमेळ जाणवतोय .’ असं दामानिया यांनी म्हटलं आहे.

# दीनानाथ रुग्णालयाला ससूनच्या अहवालातून क्लीन चिट? अहवालात नेमके काय-काय?

पुणे येथील दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाच्या हलगर्जीमुळे गर्भवती महिला तनिषा भिसे यांचा मृत्यू झाला होता, असा आरोप होत आहे. त्यानंतर या प्रकरणाची चौकशी विविध समित्यांकडून सुरु आहे. त्यातील ससून रुग्णालयाचा अहवाल पुणे पोलिसांना देण्यात आला आहे. हा अहवाल ‘टीव्ही ९ मराठी’ला मिळाला आहे. त्या अहवालातील निष्कर्षानुसार मंगेशकर रुग्णालयाला क्लीन चिटच मिळण्याची शक्यता आहे. एकूण तीन समित्या या प्रकरणाची चौकशी करत आहे. तनिषा भिसे मृत्यू प्रकरणात दोन दिवसांपूर्वी ससून रुग्णालयाच्या चौकशी समितीने अहवाल पुणे पोलिसांना दिला. या अहवालातील निष्कर्ष हाती लागले आहे. त्यात काय काय म्हटले आहे पाहू या...

इंदिरा आयव्हीएफमध्ये तब्येतीत सुधारणा होत नसताना देखील 4-5 दिवस दाखल करून घेणे चूक होती. गर्भवती महिलेच्या प्रकृतीत सुधारणा होत नसल्याचे स्पष्ट झालेले असताना तनिषा भिसे यांना दुसऱ्या रुग्णालयात पाठवायला हवे होते. या सगळ्यात आयव्हीएफ सेंटरची जबाबदारी महत्वाची आहे. त्यांनी लवकर रुग्णास दुसरीकडे पाठवणे गरजेचे होते. तनिषा भिसे यांना मंगेशकर रुग्णालयात पाच तास थांबवले होते. मात्र या वेळी पैसे घेतले की नाही? किंवा हेच कारण होते का? पैसे द्या नाहीतर ट्रीटमेंट करणार नाही, असे प्रश्न होते. याबाबत आरोग्य उपसंचालक यांनी चौकशी करून अहवाल द्यायचा आहे. त्याची चौकशी आरोग्य उपसंचालक यांनी केली आहे. अती जोखमीची परिस्थिती असताना मल्टीस्पेशालिटी रुग्णालयामध्ये तनिषा भिसे यांना नेण्याची गरज होती. मात्र ते करण्यात आले नाही. त्या महिलेस सूर्या रुग्णालयात नेण्यात आले. त्या ठिकाणी प्रसृती झाली. मात्र रुग्णालयात कोणताही कार्डिओलॉजिस्ट उपलब्ध नव्हता. त्या महिलेस हृदयविकाराच्या धोका वाढला होता. त्यामुळे जवळपास दोन तास सीपीआर दिले जात होते. गर्भवती महिला गुंतागुंतीचे रुग्ण होता. मृत्यू मणिपालमध्ये झाला.

# गेवराईतील आगरनांदुर येथून बैलजोडी चोरीला

गेवराई : प्रतिनिधी गेवराई तालुक्यातील आगर नांदूर येथे शेतातून बैलजोडी चोरल्याची भलतीच घटना शुक्रवारी सकाळी समोर आली आहे. बालाप्रसाद किसनलाल सोमानी या शेतकऱ्याच्या गट क्रमांक 263 मधील शेतामध्ये बांधलेली जवळपास 1 लाख रुपये किंमतीची बैलजोडी चोरांनी पळवून नेली आहे, यामुळे शेतकऱ्यांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले आहे.

गेवराई तालुक्यातील आगर नांदूर शिवारात बालाप्रसाद किसनलाल सोमानी यांची गट नं.263 मध्ये शेती आहे. या शेतातील गोठ्यात बांधलेली बैलजोडी चोरीला गेल्यास परिसरात खळबळ उडाली आहे. दरम्यान बालाप्रसाद सोमाणी यांनी पोसीस स्टेशनला दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, आगर नांदूर येथे मी माझे कुंटुबासह राहतो. मी शेतीचा व्यवसाय करून उदरनिर्वाह चालवितो माझ्याकडे आगार नांदूर शिवारात गट.नं. 263 मध्ये आठ एकर शेती आहे. शेतीच्या मशागतीसाठी माझ्याकडे बैलजोडी आहे. त्यांचेसाठी गट. नं.



263 मध्ये गोटा बांधलेला आहे. दि. 17/04/2025 रोजी सांयकाळी सात वाजण्याच्या सुमारास मी माझे शेतातील गट नं 263 मध्ये असलेल्या गोठ्यावरून जनावरांना चारापाणी करून घरी आलो. दि.18/04/2025 रोजी सकाळी 7 वाजता शेतात गोठ्यावर जनावरांना चारापाणी करण्यासाठी गेलो असता गोठ्यामध्ये बैलजोडी दिसून आली नाही. त्यामुळे मी आजूबाजूला व इतर ठिकाणी बैलांचा शोध घेतला असता ते मिळून आले नाहीत. दोन पांढऱ्या रंगाचे खिलार जातीचे उभे अर्धवट गोलाकार शिंगे असलेले बैल, असे चोरीला गेलेल्या बैलाचे वर्णन असल्याचे सोमानी यांनी फिर्यादीत म्हटले आहे. तरी हे दोन्ही बैल शेतातील गोठ्यातून कोणीतरी अज्ञात चोरट्यांनी चोरुन नेले आहेत. याप्रकरणी अज्ञात चोरट्यांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास गेवराई पोलिस करत आहेत.

# तलावातुन बेसुमार पाणी उपसा सुरुच ; जिल्हा प्रशासन कागदी घोडे नाचविण्यातच समाधानी भिषण पाणीटंचाईचा सामना करावा लागणार

## बीड जिल्ह्यातील १६७ प्रकल्पात केवळ २४ टक्के उपयुक्त पाणीसाठा ; ४६ प्रकल्प जोत्याखाली तर १२ प्रकल्प कोरडेठाक :- डॉ.गणेश ढवळे

बीड:- ( दि.१८) उन्हाचा पारा वाढत असल्याने पाण्याचा वापर आणि बाष्पीभवनाचा वेग आधिकच वाढला आहे.परीणामी तलावातील पाणी दिवसेंदिवस कमी होत आहे.जिल्ह्यातील १६७ प्रकल्पांमध्ये सध्या १८३ दलघमी ( २३.८८ टक्के ) एवढाच उपयुक्त पाणीसाठा आहे.आता १४५ प्रकल्पातील पाणीसाठा निम्म्यापेक्षा कमी आहे.४५ प्रकल्पातील पाणी जोत्याखाली गेले आहे.१२ प्रकल्प कोरडे ठाक पडले आहेत.जिल्ह्याची पावसाची वार्षिक सरासरी ५३६ मिलीमिटर आहे.गतवर्षी तब्बल ८३७ मिलीमीटर एवढ्या पावसाची नोंद झाली होती त्यामुळे सगळे प्रकल्प ओसंडून वाहत होते.परंतुआता प्रकल्पातील पाणी कमी होण्यासह शेतातील विहीरी, सार्वजनिक पाणी योजनेच्या विहिरी,विंधन विहिरी कोरड्या पडत चालल्या आहेत. त्यामुळे ग्रामीण भागात पाणी टंचाईच्या झळांचा सामना करावा लागणार आहे.

याचवेळी जिल्हा प्रशासनाने ३१ मार्च रोजी आयुक्तांना संभाव्य पाणीटंचाई निवारणासाठी ५८ कोटी १९ लाख ४९ हजार रुपये निधीची आवश्यकता असल्याचे कळवले असुन तसे नियोजन सुरू आहे मात्र संभाव्य पाणी टंचाई अनुषंगाने निवासी उपजिल्हाधिकारी बीड शिवकुमार स्वामी यांनी अनाधिकृत पाणी उपसा बंद ठेवण्याबाबत तहसीलदारांना दिलेल्या सुचना कागदावरच राहिल्या असुन तालावातुन पाण्याचा बेसुमार उपसा सुरू असल्याचे निदर्शनास आले असुन कागदी घोडे नाचवण्यात जिल्हा व तहसिल प्रशासन समाधान मानत असुन संभाव्य पाणीटंचाई रोखण्यासाठी वास्तविक तहसीलदार यांनी नेमलेल्या पाटबंधारे विभाग, तहसील विभाग, महावितरण विभाग आणि गटविकास अधिकारी कार्यालयातील अधिकारी यांच्या संयुक्त पथकाने अवैध पाणी उपश्यावर प्रतिबंध घालावा अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी जिल्हाधिकारी बीड यांना केली आहे.

शिवकुमार स्वामी निवासी उपजिल्हाधिकारी बीड यांचे तहसील प्रशासनाला निर्देश मात्र तहसील प्रशासन गाढ झोपेत

------

उन्हाळ्यामुळे पाटबंधारे प्रकल्पातील पाणी साठा झपाट्याने कमी होत आहे. जिल्ह्याचा अवर्षण प्रवण ईतिहास पाहता दुर्दैवाने पर्जन्यमानाने ओढ दिल्यास पाणी टंचाई निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेता.

जिल्ह्यातील पाटबंधारे प्रकल्पाच्या ठिकाणची विद्युत मोटारी व अन्य साधनांद्वारे करण्यात येणारा पाणी उपसा रोखण्यासाठी प्रशासनाने संबंधित पाटबंधारे विभागाचे अधिकारी,



कर्मचारी,तहसील कार्यालयाचे कर्मचारी, गटविकास अधिकारी कार्यालयातील कर्मचारी व महावितरण विभागाचे अधिकारी यांची संयुक्त पथके सर्व तहसीलदार यांनी स्थापित करून अवैध पाणी उपश्यावर प्रतिबंध घालण्यात यावा व तसा अहवाल कार्यालयास सादर करण्यात यावा अशा सुचना निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी दिल्या आहेत. मात्र तहसील प्रशासन गाढ झोपेत असल्याचे दिसून येत आहे.

जिल्हा प्रशासनाचे नियोजन ५९ कोटींचा संभाव्य पाणीटंचाई आराखडा फक्त कागदावरच

----

जिल्ह्यात चांगले पर्जन्यमान झाल्याने ८ एप्रिल पर्यंत एकही टँकर सुरू नाही. गतवर्षी एप्रिल मध्ये १५० तर मे आणि जून मध्ये हा आकडा ४६७ वर गेला होता. जिल्हा प्रशासनाने ३१ मार्च रोजी विभागीय आयुक्तांना संभाव्य पाणी टंचाई गावे निश्चित करून कृती आराखडा पाठवला आहे.त्यामध्ये २४५२ गावांसह १६७६ वाड्यांसाठी योजना राबविण्यासाठी संभाव्य पाणीटंचाई निवारणासाठी ५८ कोटी ९४ लाख ४९ हजार रुपयांचा आराखडा पाठवला आहे.जुन जुलै पर्यंत पाणीटंचाईचा सामना करावा लागणार आहे.त्यामुळे विहिर अधिग्रहण, बोअर अधिग्रहण, टँकर सुरू करणे, तात्पुरती नळ योजना, जुन्या नळयोजनांची दुरुस्ती, नविन विहीरी खोदणे,विहारीतील गाळ काढणे असा संभाव्य टंचाई आराखडा जिल्हा प्रशासनाने तयार करून आयुक्तांकडे पाठवला आहे. मात्र हा आराखडा केवळ कागदावरच राहु नये तर प्रत्यक्षात अमलात आणावा अशी मागणी डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केली आहे.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
शनिवार १९ एप्रिल २०२५
https://lokaarambh.com


संपादकीय

# सोशल मीडियावरही आयपीएलचा फिव्हर !

आयपीएल अर्थात इंडियन प्रीमियर लीगचे हे अठरावं वर्ष आहे. सलग अठरा वर्ष आपली लोकप्रियता टिकवून ठेवणारी आयपीएल ही जगातील एकमेव क्रिकेट लीग आहे. गेली अठरा वर्ष केवळ भारतातीलच नाही तर जगातील सर्वाधिक लोकप्रिय क्रिकेट लीग म्हणून आयपीएलकडे पाहिले जाते. जगभरातील अनेक दिग्गज खेळाडू या लीगमध्ये सहभागी होतात. मुळातच क्रिकेटला एका धर्माप्रमाणे स्थान असलेल्या भारतामध्ये आयपीएल सुरू असल्याने सहभागी संघाचे फॅन फॉलोअर्सची संख्या देखील खूप मोठी आहे. आपल्या आवडत्या संघाला सपोर्ट करण्यासाठी फॅन मैदानावर गर्दी करताना दिसतात. आयपीएलचा सामना कोणत्याही मैदानावर, कोणत्याही शहरांमध्ये असो क्रिकेट रसिकांच्या उदंड प्रतिसादामुळे मैदाने तुडुंब भरली असल्याचे चित्र आपण दरवर्षीच पाहतो मात्र यावर्षी मैदानासोबतच मैदानाबाहेरही आपल्या आवडत्या संघाला सपोर्ट करण्यासाठी चाहत्यांमध्ये स्पर्धा लागली आहे. आजचे युग सोशल मीडियाचे युग आहे. सोशल मीडियाचा वापर न करणारा क्रिकेट चाहता शोधूनही सापडणार नाही. आयपीएलमध्ये सहभागी असणाऱ्या सर्वच्या सर्व म्हणजे दहाच्या दहा संघाचे स्वतंत्र ट्विटर (एक्स) अकाउंटस आहेत. प्रत्येक संघाला ट्विटरवर (एक्स) फॉलो करणारे लाखो फॉलोअर्स आहेत. हे फॉलोअर्स ट्विटर वरून आपल्या आवडत्या संघाला सपोर्ट करत असतात. आयपीएलची मॅच चालू असताना ट्विट्स चा अक्षरशः पाऊस पडतो. सेकंदाला हजारो ट्विट्स येत असतात. जो तो आपल्या संघाला सपोर्ट करण्यासाठी ट्विट करत असतात. या सर्वांमध्ये मुंबई इंडियन्स आणि रॉयल बंगळुरू चॅलेंज या संघांचे फॅन फॉलोअर्स सर्वात जास्त आहेत. ट्विटर प्रमाणेच व्हाट्सएप, फेसबुक, इन्स्टाग्रामवर देखील चाहते आपल्या संघाला सपोर्ट करीत असतात. आपल्या आवडत्या संघाची मॅच असेल तर चाहते आपल्या संघाला सपोर्ट करण्यासाठी व्हाट्सएपवर स्टेटस ठेवतात. सध्या सोशल मीडियाचं चित्र पाहिलं तर मुंबई इंडियन्स, चेन्नई सुपर किंग व रॉयल चेलेंजर्स बंगळुरू या तीन संघांना सोशल मीडियावर चाहत्यांचा सर्वात जास्त सपोर्ट मिळताना दिसत आहे. खेळाडूंमध्ये सर्वात जास्त सपोर्ट रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाच्या विराट कोहली याला मिळत आहे. टी २० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्त झाला तरी विराट कोहलीची लोकप्रियता तसूभरही कमी झाली नाही उलट वाढतच चालली आहे हे सोशल मीडियावरुन लक्षात येते. दूरचित्रवाणीवर तर प्रेक्षक सामने पाहतच असतात पण ज्यांना दूरचित्रवाणीवर सामना पाहणे शक्य होत नाही ते मोबाईलवर सामना पाहतात. रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाचा सामना कोणत्याही संघासोबत असला तरी प्रेक्षक त्यांचा सामना आवर्जून पाहतात. रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूचा सामना जिओ टीव्ही वर सर्वात जास्त पाहिला जातो. करोडो प्रेक्षक जिओ टीव्हीवर सामने पाहतात. प्रत्येक सामन्याला करोडो प्रेक्षक मिळतात हा एक विश्वविक्रमच आहे. फेसबुक, व्हाट्सएपवर मॅच कोण जिंकणार याबद्दल चाहत्यांमध्ये पैजा लागत आहे. मॅच संपल्यानंतर मॅचवर आधारित तसेच प्रतिस्पर्धी खेळाडूंच्या खिल्ली उडवणाऱ्या मजेशीर मिम्स बनवून व्हायरल केल्या जात आहे. हे मिम्स बोलके असतात. यातून करमणूक तर होतेच पण संघाची सद्यस्थिती काय आहे हे देखील समजते. गुजरात टायटन संघाचा मुख्य प्रशिक्षक आशिष नेहरा खेळाडूंना सतत काही ना काही सल्ले देत असतो. ड्रिंक्स ब्रेक मध्ये तर तो कर्णधार आणि खेळाडूंना सल्ला देत असतोच पण सामना चालू असतानाही तो खेळाडूंचे डोके खात असतो. वेडावाकडा चेहरा करून हातवारे करत तो खेळाडूंचे डोके खात असतो त्यामुळे त्याची खिल्ली उडवणारे अनेक मिम्स सोशल मीडियावर धुमाकूळ घालत आहेत. चेन्नई आणि मुंबई संघ सध्या पराभवाच्या गर्तेत सापडले आहेत. सलग पाच सामन्यात पराभव झाल्याने चेन्नई संघ नेटिझन्सच्या निशाण्यावर आला असून या संघाची सोशल मीडियावर चांगलीच खेचली जात आहे. तीच गत मुंबईची आहे. मुंबईचाही सलग चार सामन्यात पराभव झाला आहे. त्यामुळे या दोन्ही संघांना सोशल मीडियावर टार्गेट केले जात आहे. या दोन्ही संघाचे आधारस्तंभ असलेले धोनी आणि रोहित शर्मा हे देखील आपल्या लौकिकाला साजेशी कामगिरी करत नसल्याने त्यांची देखील सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात खिल्ली उडवली जात आहे. प्रतिस्पर्धी संघाची आणि संघातील खेळाडूंची मजेशीर मिम्स आणि बनवून आणि मेसेज करून खिल्ली उडवतानाच नेटकरी आपल्या आवडत्या संघाला मात्र भरघोस पाठिंबा देत आहेत. आपल्या आवडत्या संघाला भरघोस पाठिंबा देतानाच प्रतिस्पर्धी संघाची खिल्ली उडवून फॅन आयपीएलचा फिव्हर आणखी वाढवत आहे. एकूणच केवळ मैदानावरच नव्हे सोशल मीडियावर देखील आयपीएलचा फिव्हर वाढल्याचे दिसून येत आहे

## खेळ श्रावण सरीचा

................

खेळ श्रावण सरीचा
पहिल्या सुगंधाचा ..

मिठीत श्रृंगाराचे
औजार एकवटुन ,
फडफड करणारे
काळीज ,
स्वप्नांचे तुकडे करून
शब्दांचे डाग मुकाट्याने छळत जाणाऱ्या ,
उभरठ्याच्या आतील कथा ...

कोरत जातात लांब सडक सुरुंग
काळया मातीच्या उरातून
भेडसावत जातात पावलांना नव्या वाटेचे
पुसट भासणारे जाळे ..

मग झिडकाऊन तोडावी लागते नाळ दुधाची
..
उजेडात न्हाहून निघण्यासाठी ..
घ्यावा लागतो काळोख अंगावरती ..
उतरलेल्या भावना गिळण्यासाठी ...
सुरकुत्या पडलेल्या मुखवट्या वरती खेळतात
पडद्या मागचे साळसूपणे आवक्षण
करणारे हात ....

मग ओशलतात .. अंगाची ताठर वलय
पांढऱ्या काविला प्रमाणे आतल्या आत
कुढत जातात ..

जेंव्हा आभाळाचे पांघरून ओढत माणसे
माणसाला फडात जातात ..
वाटेकरी होऊन रक्ताची पिसाळलेला पिसाज
आपल्याच नजरेने मारावी लागतात ..

द्यावा लागतो समाईचा उजेड काखेत वारस
पेल्ल्यावर ..
मग तेजाच्या सावल्या टीमटीम करू लागतात
एक तारा तुटल्यावर..

सावरू लागतात .. अंगणात पडलेला सडा
फुलांच्या पाकळ्या सवे ,दगड मातीच्या भिंती
फुलून निघतात..
शेणा सगट पाणी शिंपल्यवर ...

मग श्रृंगाराचा भास होतो श्वेत मनावर
प्रवासाचा शीण संपतो

**कवयित्री ललित लेखक**
**तुलसीमंगल**
**मंगल वाघमारे पोसते**
**औरंगाबाद**
**9822891921**

## माणसाचं जीवन

................

आनंदी जीवन | माणसांचं जीणं |
नात्यातली वीण | गुंफलेली ||१||

मनुष्य सुखाचा | शोध घेतो मना |
दु:ख वाटू जना | वाढलेली ||२||

भाव देवा पाशी | चिंता जाळी किती |
भविष्याची भीती | पांघरली ||३||

स्वप्न पूर्ण होई | कष्ट करा फार |
जीवनाचं सार | सामावले ||४||

भक्ती विठोबाची | गोडी अभंगाची |
सेवा मानवतेची | जपलेली||५||

राबलो धावलो | थांबलोच नाही |
मनी हार नाही | मानलेली ||६||

आयुष्य लाभलं | माया दाखवावी
काया सुखवावी | दमलेली ||७||

श्वास हा मोकळा | घेऊन भरुन |
दु:खे ती सोडून | कोंडलेली ||८||

**श्री.जयराम मांजरे-पाटील,**
**शहापूर**

## भीमा तुझ्या जन्मामुळे ....!

................

जगाला युद्ध नको बुद्ध हवा
शांतीचा संदेश जगात पोहचावा
मानवता,जनकल्याणासाठी
बुद्धरुपात आजही धम्म बुद्ध जन्मावा

राज्यघटना देशाची नमूद प्रणाली
बाबासाहेबांचे पंचशील तत्व मोलाचे
भीमा तुझ्या जन्मामुळे गवसले
जगात सुखशांतीत चमकत्या ताऱ्याचे

'बाभिमा'धम्मचक्र फिरे तुझे जगावरी
तंत्र मानवहित कल्याणकारी
सोडू वाट रुढीपरंपरेची अंधश्रद्धेची
वैज्ञानिक दृष्टीची चढ पायरी

करुणामय गौतमबुद्ध आचरण
जगभर गाजले जनमानसावर
बुद्धम् शरणम गच्छामि जयघोष
आंबेडकरांचा जयभीम नित्य ओठावर

सौ सुवर्णा तावरे विटामंत्रीपद कसं भूषवावं
करु नये खऱ्याचा कधीच खोटा
वंचितांना मिळे शिक्षणात- नोकरीत कोटा
हे माझ्या बाबांनी.....

**~ @ शब्दश्री विलास देवळेकर**

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती दिवशी समाजसेविका,अभिनेत्री करुणा काथखडे यांजकडून मोफत पाणी वाटप



कल्याण(प्रतिनिधी-गुरुनाथ तिरपणकर)महामानव घटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी महाड येथील चवदार तळ्याजवळ सत्याग्रह केला.दलित शोषितांना न्याय मिळवून दिला. त्यांच्या बहुमोल शिकवणीचा आदर ठेवून येथील समाजसेविका व अभिनेत्री करुणा काथखडे समाजकार्य करत आहेत.डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या१३४व्या जयंती दिवशी करुणा काथखडे यांनी सर्वांसाठी कल्याण स्टेशनला मोफत पाणी वाटवाचा कार्यक्रम हाती घेतला होता.डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार घेऊन करुणा काथखडे या समाजसेवेचे हे काम त्यांनी अविरतपणे चालु ठेवलेले आहे.त्या समाजाच्या उत्कर्षासाठी विविध समाजउपयोगी उपक्रम राबवित असतात.करुणा काथखडे यांनी बेबसिरीज,गायन,शार्टफील्म मध्ये अभिनयाचा ठसा उमटवलेला आहे.करुणा काथखडे या येथील विविध सामाजिक संस्थांनवर पदाधिकारी म्हणून कार्यरत आहेत.तसेच विविध सामाजिक,शैक्षणिक,सांस्कृतिक संस्थांशी त्यांचे घनिष्ठ संबंध आहेत.डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती दिवशी करुणा काथखडे यांनी मोफत पाणी वाटवाच्या उपक्रमाचे कौतुक व अभिनंदन होत आहे.याप्रसंगी पाणी वाटप स्टॉलला ब-याच सन्मानिय प्रतिभावंत आंबेडकर अनुयायांनी भेटी देऊन कौतुक कले.करुणा काथखडे यांनी सर्वांना गुलाबपुष्प देऊन स्वागत केले.

# गुरुनानक विद्यालयातील विद्यार्थ्यांचे रामानुजन ऑलिम्पियाड परीक्षेत घवघवीत यश

थोर भारतीय गणिततज्ञ श्रीनिवास रामानुजन यांच्या जन्मदिनी 22 डिसेंबर रोजी संपूर्ण भारतात गणित ऑलपियाड परीक्षा इयत्ता 1 ली ते 12 वी विद्यार्थ्यासाठी घेण्यात येते, त्याचा निकाल नुकताच जाहीर झाला आहे. यामध्ये बीड जिल्ह्यामध्ये श्री. विठ्ठलगड शिक्षण प्रसारक मंडळ संचलित, गुरुनानक प्राथमिक विद्यालय,बीड या शाळेने सर्वाधिक मेडल मिळवत त्यांनी सर्वाधिक मेडल मिळवण्याची परंपरा कायम ठेवली आहे संपूर्ण बीड जिल्ह्यात झालेल्या या परीक्षेत सर्वाधिक मेडल मिळविण्याचा मान गुरुनानक प्राथमिक विद्यालय बीड. या शाळेस मिळाला आहे .यामध्ये कु.अनुश्री गदळे, चि.देवांश गदळे, कु. रिसिका गुप्ता, चि.विवान कुंडरे, कु. इशिता सांगुळे चि.तन्मय पवार,चि.यशराज फाटक, कु.सय्यद अफिफा, चि.पव्हणे विराज, चि.आयुष राठोड, कु. स्वरा तिपाले, चि.अजय सोनवणे, कु.अनुजा स्वामी, कु. हर्षाली चंदनशिव, यांना गोल्ड मेडल मिळाले



आहे तर चि.देवांश सपकाळ, चि.शेख मुसद्दिक , कु.स्वरा पाटील , चि.समर्थ शहाणे , चि.वैभव स्वामी, चि.अर्णव राठोड, चि.आर्यन सपकाळ , कु.अवंतिका वनवे , चि.आर्यन तिपाले , चि.निखील आंधळे , चि.समर्थ नितनवरे , चि.शिवानंद पवार, चि.श्रीनिवास सोनवणे , चि.अनुष कु.गदळे राजनंदिनी दुबाले, चि.समर्थ जाधव, चि.शैख मुस्कान . कु.अनुष्का गिरे यांना सिल्वर मेडल पटकावले तर चि.शिवराज चिरखे , चि.अथर्व ठोकरे , चि.जीशान बागवान , चि.अथर्व राठोड, चि.सोनवणे शौर्य , चि.शेख अमन, चि.शेख फैझान चि.सिद्धांत धबाले, चि.राधेशाम सोसे , कु.सृष्टी आंधळे, चि.आदित्य काळे, चि.ओमसाई गायकवाड यांनी ब्रॉन्झ मेडल असे मेडल शाळेतील गणित शिक्षक श्री गदळे राजेश यांच्या अथक परिश्रमाचे हे फळ आहे, तसेच ते नवनवीन उपक्रम राबवत असतात असे मत शाळेतील मुख्याध्यापिका श्रीमती पवार सुरेखा मॅडम, श्रीमती हंगे सविता मॅडम, श्रीमती पव्हणे प्रिती मॅडम, श्रीमती डोंगरे उज्ज्वला मॅडम, श्रीमती मुंडे सविता मॅडम, श्री तेलप रामचंद्र सर, श्री ठोकरे महेश, श्री तांदळे अशोक सर, यांनी मांडले आहे. या यशाबद्दल श्री गदळे सर यांचे कौतुक करावे तेवढे कमी आहे असे मत कृष्णा अर्बन को- ऑप बँक लि चेअरमन श्री विजयकांत मुंडे व सर्व पालक वर्ग यांनी व्यक्त केले आहे. मुलांच्या या यशाबद्दल सर्व स्तरातून कौतुक करण्यात येत आहे. असे घवघवीत यश शाळेतील विद्यार्थ्यांनी संपादन केले आहे. सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे..

## 'नेमकं घोडं अडलं कुठं? तुम्ही... ', शेतकरी कर्जमाफीच्या मुद्द्यावर बच्चू कडू आक्रमक

सध्या राज्यात शेतकरी कर्जमाफीच्या मुद्द्यावरून वातावरण चांगलंच तापलं आहे. निवडणूक काळात महायुतीकडून शेतकरी कर्जमाफीचं आश्वासन देण्यात आलं होतं. मात्र सध्या महायुतीच्या नेत्यांकडून कर्जमाफीसंदर्भात सुरू असलेल्या वक्तव्यांमुळे कर्जमाफीबाबत शेतकऱ्यांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे. यावर बोलताना पुन्हा एकदा माजी आमदार बच्चू कडू यांनी सरकारवर जोरदार हल्लाबोल केला आहे.

नेमकं काय म्हणाले बच्चू कडू?


हा विषय आम्ही मुख्यमंत्र्याकडे घेऊन जाणार आहोत. आम्ही कर्जमाफीच्या बाजूने आहोत कर्जमाफी झाली पाहिजे अशी मानसिकता आहे, असं माणिकराव कोकाटे म्हणत आहेत, मग घोडं अडलं कुठे. तुम्ही घोषणा केल्यामुळे लोकांनी कर्ज भरलं नाही, त्यामुळे व्याज माफ झालं नाही. त्यामुळे आता नवीन कर्ज शेतकऱ्यांना भेटत नाही, शेतकरी आर्थिक अडचणीत आला आहे. तुम्ही घोषणा केली नसती तर त्यांनी कर्ज भरलं असतं, तुम्ही घोषणा केल्यामुळे ते आता कर्ज भरत नाहीत. आम्ही कर्जमाफी झाल्याशिवाय स्वस्त बसणार नाही, काही झालं तरी बहेत्तर असा इशारा बच्चू कडू यांनी यावेळी दिला आहे. दरम्यान यावेळी बोलताना त्यांनी हिंदुत्त्वाच्या मुद्द्यावरून उपमुख्यमंत्री अजित पवार आणि मंत्री नितेश राणे यांना जोरदार टोला लगावला आहे. त्यांच्या हिंदुत्वाचा विचार भाजपाने एकदा पक्का केला पाहिजे, काँग्रेसने ईदच्या निमित्ताने भेट दिली असती तर तुम्ही बोभाटा केला असता काँग्रेसचा धर्म बदलला असता. तुमच्या हिंदुत्वामध्ये मुसलमानांना काय स्थान आहे, बुद्धांना काय स्थान आहे? असा सवाल यावेळी बच्चू कडू यांनी उपस्थित केला आहे.

निलंबित पोलीस अधिकारी रंजित कासले यांनी गंभीर आरोप केले आहेत, यावर देखील बच्चू कडू यांनी प्रतिक्रिया दिली आहे. आपल्याला वाल्मिक कराडच्या एन्काऊंटरची ऑफर देण्यात आली होती, असा दावा कासले यांनी केला आहे. यावर बोलताना प्रकरण गंभीर आहे, तपास झाला पाहिजे. मराठड्यात नवीन इतिहास होऊ नये हीच अपेक्षा आहे. बीडमधून नवीनच काहीतरी ऐकायला येतं आहे, असं बच्चू कडू यांनी म्हटलं आहे.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर
शनिवार १९ एप्रिल २०२५
https://lokaarambh.com



# ऋतुजा चे अभिनंदन !




पुण्याच्या ऋतुजा वऱ्हाडे या मुलीने राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी म्हणजेच एन डी परीक्षेत संपूर्ण राज्यातून मुलींमध्ये पहिली येण्याचा तसेच देशातून गुणवत्ता यादीत तिसरी येण्याचा मान मिळविला आहे.पूर्वी मुलींना सैन्यात जाण्यासाठी मुभा नव्हती.परंतु २०२१ साली सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार मुलींना प्रथमच सैन्याची दारे खुली करण्यात आलीं.त्यानुसार मुलींची पहिली बॅच येत्या मे महिन्यात कोर्स पूर्ण करून बाहेर पडणार आहे. यू पी एस सी तर्फे एन डी ए प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येते.२०२१ साली साधारण दीड लाख मुलींनी अर्ज केला होता यामध्ये ऋतुजा टॉपर ठरली. ऋतुजा चे आईवडील शिक्षक असून तिने नववीत असतानाच सैन्यात जाण्याचे ठरविले होते.एक चॅलेंजिंग फील्ड म्हणून सैन्यात जाण्यास अनेकजण उत्सुक असतात.खडतर अभ्यास, कठीण प्रवेश परीक्षा पार करून एखादा सैन्यात दाखल होत असतो.देशाच्या सीमेवर सैनिक डोळ्यात तेल घालून रात्रंदिवस देशाचे रक्षण करत असतात.घरादारापासून दूर राहून आपले कर्तव्य निभावत असतात.ऋतुकाचा पायलट होण्याचा मानस आहे.तिचे खूप खूप अभिनंदन !

गणेश हिरवे

# एक्सप्रेस मध्ये ए टी एम

रेल्वे प्रशासनाने धावत्या एक्सप्रेस मध्ये ए टी एम सुरू करण्याचा निर्णय घेतला असून याचा शुभारंभ मुंबई मनमाड दरम्यान धावणाऱ्या पंचवटी एक्स्प्रेस ने सुरू करण्यात आला आहे.भारतात पहिल्यांदाच असा प्रयोग या एक्सप्रेस मध्ये सुरू करून टप्प्या टप्प्याने इतर अनेक ट्रेन्स मध्ये सुरु करणार असल्याचे रेल्वे प्रशासनाचे म्हणणे आहे.लांब प्रवास करताना अनेकवेळा प्रवाशांचे पैसे संपतात किंवा काहीवेळा तोकडे पैसे घेऊन काहीजण प्रवास करीत असतात.जास्त पैशाची गजर भासल्यास प्रवाशाना प्लॅटफॉर्म किंवा स्टेशन बाहेर जाऊन ए टी एम मधून पैसे काढावे लागत असत, त्यामुळे कधीकधी ट्रेन देखील मिस होत असायच्या.आज पॅसेंजर पासून सुपर फास्ट एक्सप्रेस, वंदे भारत एक्सप्रेस, मेट्रो पर्यंत रेल्वे ने विकासाचा टप्पा गाठलेला आहे. प्रवाशांना वेळोवेळी वेगवेगळ्या सोयी सुविधा देण्यासाठी रेल्वे प्रशासन सज्ज असते.सध्या अमृत भारत योजने अंतर्गत अनेक रेल्वे स्थानकांचा कायापालट करण्याचे काम सुरू आहे.त्याचाच एक भाग म्हणून गाड्यांमध्ये ए टी एम मशिन्स बसविली जात आहेत.

गणेश हिरवे
जोगेश्वरी पूर्व

# ज्यांनी हिंदुत्व सोडलं त्यांनी आता..., गुलाबराव पाटील यांचा पुन्हा उद्धव ठाकरेंना टोला

शिवसेनेचे नेते आणि मंत्री गुलाबराव पाटील यांनी पुन्हा एकदा शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला आहे. उद्धव ठाकरे यांनी आपली विचारधारा सोडली आहे, त्यांनी आपल्या पक्षाचे, वडिलांचे विचार सोडले आहेत, त्यांनी आता कोणाला मार्गदर्शन करण्याची गरज नाही. उद्धव ठाकरे यांच्या भाषणाची सुरुवात आता माझ्या शिवसेनेच्या बांधवांनो व भगिनींनो अशी होते. बाळासाहेबांच्या भाषणाची सुरुवात हिंदू माता भगिनींनो आणि मित्रांनो अशी होत होती. भाषणाच्या सुरुवातीचे वाक्य उद्धव ठाकरे यांनी गाडले आहे, त्यामुळे आता त्यांनी बाकीच्या गोष्टी बोलण्यात अर्थ नाही, असा टोला पाटील यांनी यावेळी लगावला आहे.बाळासाहेबांच्या एआय भाषणावर प्रतिक्रिया देताना देखील त्यांनी जोरदार टोला लगावला आहे. ज्यांनी हिंदुत्व सोडलं त्यांनी आता बाळासाहेबांचे भाषण दाखवून उपयोग नाही, बाळासाहेबांनी त्यावेळेस काय विचार मांडले होते. पक्ष कसा स्थापन केला होता? आणि आता आपण काय करतोय? त्यामुळे हे बाळासाहेबांचे भाषणं त्यांनीच आता पहावे असा टोला यावेळी गुलाबराव पाटील यांनी लगावला आहे.दरम्यान यावेळी बोलताना त्यांनी आदित्य ठाकरे यांच्यावर देखील हल्लाबोल केला आहे.

# राजेवाडी येथील बौध्दविहाराच्या जागेवरील अतिक्रमण तात्काळ हटवा

तालुक्यातील राजेवाडी येथील भीमनगर बौद्धविहाराच्या नियोजीत जागेवर नारायण सोनपसारे यांनी अतिक्रमण करून ताबा घेतला असल्याने ग्रामस्थांनी सरपंच व ग्रामसेवक यांच्याकडे न्यायासाठी धाव घेतली आहे. राजेवाडी येथील नारायण संभाजी सोनपसारे यांनी गावातील भीमनगर भागातील बौद्धविहाराची नियोजित जागा हडप करण्याच्या उद्देशाने अतिक्रमण करून घेतली आहे. ग्रामस्थांनी वारंवार तोंडी सूचना दिल्या विनंती केली परंतु नारायण सोनपसारे हे कुनाचंही ऐकायला तयार नसल्याने शेवटी ग्रामस्थांच्या वतीने आर पी आय नेते गंगाधर सोनपसारे बहुजन विकास मोर्चा चे नेते अभिजीत पोटभरे व ग्रामस्थ महादेव सोनपसारे यांनी राजेवाडी येथील सरपंच व ग्रामसेवक यांच्याकडे धाव घेतली असुन लवकरात लवकर अतिक्रमण हटवुन बौद्धविहाराची जागा ताब्यात घेऊन समाज बांधवांच्या ताब्यात द्यावी अन्यथा उपोषण करण्यात येईल अशा अशयाची निवेदनाव्दारे मागणी करण्यात आली आहे.

# तारगावच्या अंगणवाडीत संविधान जागर. बालकांच्या मनात उजळला भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्याचा दीप.

भिडेवाडाकार कवी, फुलेप्रेमी संविधान दूत विजय वडवेराव सर आयोजित माझे संविधान माझी जबाबदारी हा उपक्रम अनेक जिल्ह्यात चालू आहे. सातारा जिल्ह्यातील कवयित्री फुलेप्रेमी संविधान दूत विद्याराणी मलवडकर यांनी तारगाव येथील अंगणवाडीत जाऊन बालकांना संविधान ग्रंथाची ओळख करून दिली. त्याआधी सर्व बालकांनी सर्वच महापुरुषांच्या प्रतिमांना अभिवादन केले या उपक्रमामुळे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची ओळख बालकांच्या मनात नव्याने रुजली. "ज्या अंगणवाडीत संविधान जागर झाला त्या अंगणवाडीत माझी मुलगी शिकली होती आणि इतक्या वर्षानंतर पुन्हा तिथे जाण्याचा योग



आल्यामुळे त्या निरागस आठवणी पुन्हा जाग्या



झाल्या, बालकांना त्यांच्या मनोविश्वात जाऊन संविधानाची माहिती देतानाचा अनुभव खूप सुंदर होता.सातारा जिल्ह्यात तसेच तारगाव मध्ये विविध ठिकाणी संविधान जागर चालू आहे आणि चालू राहणारच आहे", असे विद्याराणी यांनी सांगितले. या उपक्रमासाठी अंगणवाडी सेविका पुष्पलता शंकर कुदळे, अर्चना प्रकाश जाधव मदतनीस संगीता संजय गायकवाड,पूजा संदीप गणेशकर तसेच अंगणवाडी सेविका सौ. सचिता प्रशांत देशमाने,सौ. सीमा विकास चव्हाण. मदतनीस सौ. प्रीती सोमनाथ भडांगे,सौ. छाया रविंद्र कुदळे यांचे सहकार्य लाभले.

# भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर १३४ वी जयंती विविध कार्यक्रमांनी वारजे पुणे येथे संपन्न..

दि. १४ एप्रिल २०२५ रोजी साहित्य सेवा सार्वजनिक ग्रंथालय वारजे माळवाडी पुणे येथे भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते, साहित्यसेवा सार्वजनिक ग्रथांलयाचे संस्थापक अध्यक्ष मा. श्री. चंद्रकांत कुंभार सरांनी कवी, साहित्यिक, निवेदक ॲड.उमाकांत आदमाने, नोटरी, भारत सरकार, पुणे यांना सदर कार्यकर्माचे अध्यक्ष म्हणून निमंत्रित केले होते प्रसंगी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेचे पुजन करून वंदना घेण्यात आली व डॉ. बाबासाहेबांच्या विचारांची देवाणघेवाण सर्वांच्या पर्यत झाली पाहिजे, त्यांचे महान कार्य आपण लक्ष्यात घेतले पाहिजे, भारतीय संविधान आपण रोज वाचले पाहिजे त्यातील सर्व गोष्टी आपण प्रामाणिकपणाने समजुन घेतल्या पाहिजे, तरच आजचा भारत महासत्ता ख-या अर्थाने बनेल, इयत्ता ८ ते १० वी च्या विध्यार्थाना देताना १० वी नंतर तुम्ही काय केले पाहिजे करियर मार्गदर्शन केले, आणि स्पर्धा परीक्षा आणि व्यावसायिक शिक्षणाकडे



आपले मन वळवायचे कसे ? याबद्दल माहिती दिली तद्नंतर साहित्यसेवा सार्वजनिक ग्रथांलयाचे संस्थापक अध्यक्ष मा. श्री. चंद्रकांत कुंभार सरांच्या विनंतीवरून कवी, साहित्यिक, निवेदक ॲड.उमाकांत आदमाने यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर आपण थोर विषयावर दोन कविता सादर केल्या आणि विध्यार्थी व पालकांची मने जिंकली प्रसंगी वंचित बहुजन आघाडीचे माजी उपसरपंच श्री. निराजी डोंगरदिवे यांनी बाबासाहेबांचे विचार मनोगतातून मांडले, या कार्यक्रमात महाराष्ट्र राज्य कर्मचारी परिषदेचे कोषाध्यक्ष निलेश क्षीरसागर यांनी सूत्रसंचालन केले व ग्रंथालयाचे अध्यक्ष श्री .चंद्रकांत कुंभार सरांनी सदरच्या कार्यक्रमाचे आभार मानले त्यानंतर सर्व विध्यार्थाना खाऊ वाटप करण्यात आला..

# छत्रपती संभाजीनगर, चाकणमध्ये Tesla ची इलेक्ट्रिक कार तयार होणार?

पुण्यातील चाकण आणि देशातील मोठे औद्योगिक शहर छत्रपती संभाजीनगरातील उद्योगविश्वासाठी अमेरिकेतून आनंदवार्ता येऊन धडकली आहे. मराठवाड्याच्या सांस्कृतिक राजधानीत ऑरिक सिटी, वाळूज, बजाजनगर, चित्तेगाव, चिकलठाणा, शेंद्रा पंचतारांकित असा उद्योगजगताचा पसारा वाढत आहे. त्यात जागतिक कंपन्यांची भर पडत आहेत. या मालिकेत आता जगातील सर्वात मोठी इलेक्ट्रिक कार निर्मिती करणारी कंपनी टेस्लाची भर पडण्याची दाट शक्यता आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि जागतिक अब्जाधीश एलॉन मस्क यांच्यात दूरध्वनीवरून चर्चा झाली आहे. त्याचा मोठा फायदा या दोन औद्योगिक शहरांना होणार आहे.

काय झाली चर्चा?पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि जागतिक अब्जाधीश आणि टेस्लाचा सीईओ एलॉन मस्क यांच्यात आज, 18 एप्रिल रोजी दूरध्वनीवर चर्चा झाली. पंतप्रधानांनी या चर्चेची माहिती त्यांच्या सोशल मीडिया एक्सच्या अधिकृत हँडलवरून दिली आहे. यावर्षी मोदी आणि मस्क यांच्यात वॉशिंग्टन येथे बैठक झाली होती. त्यावेळी जे मुद्दे चर्चिले गेले होते. त्यासह इतर मुद्यांवर चर्चा झाल्याची माहिती मोदींनी दिली. तंत्रज्ञान आणि नाविन्यपूर्ण प्रयोग या क्षेत्रांमध्ये दीर्घकालीन भागीदारीबाबत चर्चा झाली. भारत या क्षेत्रात अमेरिकेसोबत भागीदारीसाठी वचनबद्ध आहे.

# मुंबई विडी तंबाखू व्यापारी संघाचा ४६ व्या वर्धापन दिनाचे आयोजन




मुंबई विडी तंबाखू व्यापारी संघाचा ४६ वा वर्धापन दिन व त्यामध्ये निर्धार वार्षिक विशेषांक प्रकाशन सोहळ्याचे आयोजन बुधवार दिनांक २३ एप्रिल रोजी सायंकाळी ५ वाजता छत्रपती शिवाजी मंदिर नाट्यगृह दादर (प) येथे होणाऱ्या कार्यक्रमाप्रसंगी ॲड . आशिष शेलार सांस्कृतिक कार्य मंत्री महाराष्ट्र राज्य प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. अतिशय उत्साहात आनंदात संपन्न होणाऱ्या कार्यक्रमाला सर्वांनी उपस्थित रहावे असे आवाहन नंदकुमार हेगिष्टे सरचिटणीस यांनी केलेले आले आहे. ह्या प्रसंगी मनोरंजनाचा कार्यक्रम मराठी नाटक थेट तुमच्या घरातून याचे आयोजन करण्यात आले आहे. सर्व कार्यक्रमाच्या निमंत्रण पत्रिका संघ कार्यालयातूनच मिळतील असे संघातर्फे सूचित करण्यात आले आहे. अधिक माहिती साठी रुपेश कोलते मो. 8928225996 यांच्याशी संपर्क साधावा

# 24 तास वाचन करून भारतरत्न डॉ.आंबेडकर यांची जयंती साजरी

परळ येथील गोखले एज्युकेशन सोसायटीच्या कॉलेज ऑफ एज्युकेशन अँड रिसर्च महाविद्यालयात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वी जयंती विविध उपक्रमातून उत्साहात साजरी करण्यात आली. यामध्ये भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विविध पैलूंना उजागर करण्यासाठी वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन विद्यार्थी



परिषदेकडून डॉ. संदीप बोडके यांच्यामार्फत करण्यात आले. या स्पर्धेत तेजस्विनी धुमाळ - प्रथम, राजलक्ष्मी डांगे - द्वितीय तर सलमा पठाण या तृतीय क्रमांकाने विजयी झाल्या. तसेच महाविद्यालयाच्या ग्रंथालय विभागाकडून डॉ. शिल्पा वाघचौरे यांच्या पुढाकाराने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्यावर आधारित पुस्तक प्रदर्शनाचे आयोजन केले. यामध्ये प्रथम व द्वितीय वर्षातील बी. एड. विद्यार्थ्यांनी सहभागी होऊन पुस्तक वाचन केले. शासन परिपत्रकानुसार महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुरेंद्र हेरकळ यांनी स्वतः सलग २४ तास भारतीय संविधानाचे वाचन आणि अध्ययन करून भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती मध्ये सक्रिय सहभाग घेतला. तसेच प्राचार्यानी विद्यार्थ्यांना भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे मौलिक विचार सांगितले. या विविध उपक्रमांच्या आयोजनाबद्दल गोखले एज्युकेशन सोसायटीच्या वतीने प्राचार्य, प्राध्यापक, प्राध्यापकेतर वर्ग आणि विद्यार्थी शिक्षक यांचे संस्थेकडून अभिनंदन करण्यात आले.

# मालाड येथील एम.डी.शाह महिला महाविद्यालयात डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती विविध उपक्रमासह मोठ्या उत्साहात संपन्न झाली.

भारत कवितके मुंबई कांदिवली पश्चिम. मुंबई मालाड येथील एम .डी. शाह महिला महाविद्यालयात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती विविध उपक्रमासह मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. सोमवार दिनांक १४ एप्रिल २०२५ रोजी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त प्राचार्या डॉ दीपा शर्मा यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले,प्रा.प्रसन्न सोनावणे यांनी यावेळी त्रिशरण व पंचशील सादर करून वंदन केले.यावेळी १२,१३, आणि १५ या दिवशी महाविद्यालयात व्याख्यान, निबंध स्पर्धा, डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या वरील कवीता वाचन, या सारखे उपक्रम राबविले गेले.या




वेळी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ दीपा शर्मा म्हणाल्या की," अतिशय खडतर परिस्थितीतून जात मार्ग काढत आपले शिक्षण पूर्ण केले इंग्लंड, अमेरिका मध्ये जाऊन शिक्षण घेणे आज सोपे असले तरी स्वातंत्र्य पूर्व काळात फार कठीण होते,अशा स्थितीत त्यांनी आपले शिक्षण पूर्ण केले.त्यांना ९ भाषा येत होत्या.भारतीय राज्य घटनेची निर्मिती करताना त्यांनी सर्वांना न्याय, स्वातंत्र्य, समता,व बंधुता या मुल्यांचा स्विकार करून सर्वांना समान अधिकार दिले.त्यांचे हे कार्य देशाला दिशा व प्रेरणा देणारे आहे.स्त्री विषयक, कामगार विषयक, त्यांनी खूप महत्त्वाचे कार्य केले आहे.देशाच्या शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक क्षेत्रात त्यांनी उल्लेखनीय कामगिरी केली आहे." तर या प्रसंगी डॉ.सुधा देशपांडे म्हणाल्या," व्यवस्थेने त्रास दिला असतानाही त्यांनी आपले शिक्षण पूर्ण केले, त्यांनी विविध आंदोलने करून चळवळीच्या माध्यमातून सर्व सामान्य जनतेला न्याय मिळवून दिला.त्यांचे आत्मचरित्र आजही सर्वांना प्रेरणादायी आहे," प्रा.भूषण हिरभगत आपल्या मनोगतात म्हणाले की," इथल्या सर्व धर्म ग्रंथाचा व्यवस्थेचा अभ्यास त्यांनी केला होता, म्हणूनच संविधानाच्या माध्यमातून स्त्रियांना मूलभूत अधिकार प्राप्त करून दिले, प्रसुती रजा,पगारी रजा, आठवडा सुट्टी,बोनस,व सुरक्षितता असे मूलभूत अधिकार पुरुषांच्या बरोबरीने महिलांना ही दिले," या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.रविंद्र कांबळे यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा.मनस्वी जाधव यांनी केले.या प्रसंगी प्राचार्या डॉ दीपा शर्मा, डॉ, शुभ आचार्या ,प्रा. पराग ठक्कर,प्रा.किशोर गुप्ते,प्रा. प्रसन्न सोनावणे,गौरी कुलकर्णी आणि विद्यार्थ्यांनी उपस्थित होत्या.


# घटनाकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर

राज्यघटनेचा महान शिल्पकार तू
लोकशाहीत देशाला लाभलेला कोहिनूर तू
अनिष्ट चालीरीती बंद करून
मोठे यश संपादित केले तू
शिक्षणाच्या कित्येक पदव्या
घेऊन महान झालास तू
चवदार तळ्याची वाट दाखवून देणारा तू
किती कष्ट,अपार अवहेलना
सहन करून देशाला एक स्वतंत्र
राज्यघटना देणारा तत्ववेत्ता तू
स्वातंत्र्य,समता बंधुता आणि
एकता प्रदान करणारा तू
आज फिरून फिरून तूझी याद बघ येते
लोकशाहीत मानवाला मुक्त वावरण्याची मुभा कुठेतरी आज हरवलीय बघ बंधनांनी जखडून ठेवण्याची परत लढाई सुरू झाल्यासारखी वाटतेय . जातिव्यवस्था पार कोलमडून पडलीय असं वाटतंय माणसांनी माणसाला माणसासारखे वागण्यात कुणाला तरी चूक वाटतेय परत आपण पारतंत्र्याच्या विळख्यात तर अडकणार नाही ना...आपलीच लोक घात करतील अशी भीतीही बसलीय मनात दबा धरून.. धर्मनिरपेक्षता फक्त संविधानाच्या चौकटीत राहून कसं चालेल ना.. विचार करायला हवा आपण आज कितव्या शतकात वावरतोय. विज्ञानयुगाने केवढी क्रांती केलीय. देशाने जगात नाव मोठं केलंय. परत कुठे रे भिमा माघारी फिरायची. सगळ्यांना सद्बुद्धी दे.फक्त दोनच जाती इथे वसतात यांची आठवण करून दे.स्त्री आणि पुरुष.एकमेकांचा आदर केला कि बस्स ना... उगाचंच कशाला परत ७०वर्षे माघारी जायला हवीत लोक.
सगळेच विसरून चाललेत .काही धर्मांधांना फक्त या गोष्टीवरून वाद करायचेत , स्त्रियांना देशातील काही ठिकाणी किती छळतात.त्यांची इज्जत भर चौकात लुटतात,आपल्याच लोकांसमोर त्यांना उद्धस्त करतात.परत परत या चक्रातून जायला महाभारत घडायला नको वाटतं य.जगण्यासाठी एकचं जन्म मिळतो या धरेवर. जगू दे कि प्रत्येकाला मनासारखे. चांगल्या कामाचा हिशोब परमेश्वर ठेवीलचं ना..चिंता कशाला हवी...!

**लेखिका ©® अनिता प्र. कळसकर.**

# मौनातला चाफा या काव्यसंग्रहाच्या मुखपृष्ठाचे एका रसिकांने केलेले रसग्रहण.सलाम त्या रसिकाला.

या मुखपृष्ठाची संकल्पना मनाला भावलीपण अन् मनाला कुरतडूनही गेली.ठळकपणे दिसणारा सोनचाफा तोही "एकाकी" ........एक रितेपण दाखविणारा पण तितकाच हळवा पाकळ्यातून बोलणारा...... त्याच्याकडे मार्गक्रमणा करणारी अधीर अभिसारिका चाफ्याच्याच रंगानं आच्छादलेली अन् बारकाईनं पाहिलं तर...?? अभिसारिकेच्या सोबत जाणारी "प्रियाची कृष्णकाया".... मुखपृष्ठाला एक खोल दुःखाची छटा देणारी अभिव्यक्ती.......प्रत्यक्ष जीवनात सध्या "जीवनसाथी"सोबत नाहीय,पण तो छायारुपानं सतत सोबत असण्याची अतूटत्वाची भावनाच कवयित्री या अद्वैताचं गहिरं परिणाम साधणारं चलच्चित्र रसिकांसमोर मांडण्याचा प्रयत्न करतेय....."One vivid Picture is worth to thousand Words"एक आशयसंपन्न ठळक चित्र हे हजारो शब्दांपेक्षाही अन्वयार्थक असतं ते या चित्रानं साध्य केल्येय."ती"आणि "चाफा"ही दोनच प्रथमदर्शनी ठळकपणे नजरेत भरतात... संपूर्ण पानभर पसरलेल्या काळपटछायेनं आणि त्याची तीव्रता




वाढते ती "त्या"च्या अंधकारमय छायेत मिसळून जाणाऱ्या अस्पष्ट काळसर प्रतिमेनं....एक दुःखाचा डोहच जणू काय ओघळतोय की काय असेच वाटत राहते.अदृश्य रुपानं सदा "जोडीदार"सोबत वावरतोय,त्याची साथसोबत सतत जाणवत राहते,आणि जेव्हा मन खंतावतं वा विषण्णता सतावते,तेव्हा तोच "चाफ्या"च्या रुपानं बोलून जातो,वेडे,मी आहे ना..!सारं ठीक होईल,याच तुझ्या आर्त भावनांचं शब्दरुप होऊन मी आविष्कृत होईन....चल,सोड हा उदासपणा आणि कर लेखणी

"मौनातील चाफा"या माझ्या काव्य संग्रहाच्या मुखपृष्ठाचे रसग्रहण करणाऱ्या रसिकाचे नाव........अनेकांनी विचारले म्हणून देत आहे. श्री.तुकाराम धोंडीराम कांबळे सर.बी.ए.बी.एड्.(इंग्लिश)सेवानिवृत्त .नवे पारगांव ता.हातकणंगले जि.कोल्हापूर.भ्रमणध्वनी..7798476772. रा.शा.छत्रपती विद्यानिकेतन,कोल्हापूरचे माजी विद्यार्थी 

सज्ज आणि अखंड वाहू दे हा तुझा प्रतिभाविलास.."!....कमीत कमी रंग आणि रेषांमध्ये अत्यंत अर्थवाही मुखपृष्ठ चितारणायात चित्रकार आणि कवयित्रीची अभिव्यक्ती दृग्गोचर होते.दोघेही कवयित्री व चित्रकार अभिनंदनाच्या हक्कदार आहेत...........!!?????????

# लॉटरी वर्धापनदिन सोहळा विक्रमी विक्रीमूळे आर्थिक विकास :आयुक्त

मुंबई(प्रतिनिधी-गुरुनाथ तिरपणकर) ५५ वर्षाची परंपरा असणारी राज्य लॉटरी ५६ व्या वर्षात पदार्पण करीत आहे. ग्राहक, विक्रेते, वितरक, हितचिंतक आणि सरकार यांचा आर्थिक विकास त्यातून व्हावा ही अपेक्षा आहे. त्याची पूर्तता विक्रेत्यांनी करावी! अशी अपेक्षा महाराष्ट्र राज्याच्या लॉटरी आयुक्त प्रेरणा देशभ्रतार यांनी प्रगट केली. महाराष्ट्र शासनाची गौरवशाली परंपरा असलेल्या राज्य लॉटरीच्या ५६ व्या वर्धापनदिना निमित्याने विक्रेत्यांचे अभिनंदन आणि शुभेच्छा देत असतांनाच यापूढे लॉटरीची विक्रमी विक्री होण्यासाठी साऱ्यांनी प्राधान्याने प्रयत्न करावेत!, अशी अपेक्षा



लॉटरी आयुक्त प्रेरणा देशभ्रतार यांनी व्यक्त केली. महाराष्ट्र राज्य लॉटरीचा ५६ वा वर्धापनदिन सोहळा नुकताच मंत्रालयात लॉटरी आयुक्तांच्या दालनात साजरा करण्यात आला. त्यावेळी श्रीमती प्रेरणा देशभ्रतार बोलत होत्या लॉटरी विक्रेत्या संघटनेचे ज्येष्ठ नेते विलास सातार्डेकर यांनी आयुक्तांना पुष्पगुच्छ देऊन त्यांचे अभिनंदन केले. यावेळी वर्धापन दिना निमित्य खास प्रसिद्ध करण्यात आलेल्या 'दिव्यपथ या सुमीत सातार्डेकर संपादीत विशेषांकाचेही प्रकाशन आयुक्तांच्या हस्ते करणार आले राज्य लॉटरीच्या बंदीचे संकट जरी आज टळले असले तरीही विक्रेत्यांनी आता सर्वाधिक विक्रीसाठी सर्वोतोपरी प्रयत्न करावेत त्यामूळे अर्थचक्र सूरळीत सुरू राहील, असे सांगून आयुक्तांनी लॉटरी विक्रेत्यांचे आभार मानले. लॉटरी उपसंचालक आनंद जोशी यांचे आभार यावेळी वितरक, विक्रेते स्नेहल शाह यांनी मानले वर्धापन दिन सोहळ्यानिमित्याने आयुक्त दालनाची सजावट करण्यात आली होती. तसेच वर्धापनदिन केक कापून या सोहळ्याची सांगता झाली. यावेळी लॉटरी संघटनेचे सरचिटणीस राजेश बोरकर, उपाध्यक्ष कमलेश विश्वकर्मा, तसेच लॉटरी विभागाच्या कक्ष अधिकारी शीला यादव, कक्ष अधिकारी रोहित सोनवणे, लेखा अधिकारी संदेश ओहाळ व संबंधित सर्व अधिकारी वर्ग उपस्थित होते. वर्धापनदिन विशेषांक ' दिव्यपथ चे वितरण यावेळी करण्यात आले. संग्राहय व परिपूर्ण विशेषांक असल्याची प्रतिक्रिया प्रशासकीय अधिकारी आणि विक्रेत्यांच्या प्रतिनिधीनी यावेळी व्यक्त केली. विक्रेत्यांचे जेष्ठ नेते विलास सातार्डेकर यांनी सर्वांचे आभार मानले.

## अनु उवाच..57 हे जीवन सुंदर आहे...




सरळमार्गी जीवन जगताना कधी कधी कळत नकळत असे प्रसंग येतात की हवी-हवी वाटणारी माणसे हळू-हळू आपल्याला नको-नको वाटू लागतात. कारण ते त्यांच्या वागण्यानं आपल्याला जाता-येता हर्ट करत असतात आणि आपलं मन दुखावलं जात, खरंच आपले मित्र, मैत्रिणी, नातेवाईक, कुटुंबीय इतके वाईट आहेत का? आपल्याला छळायचंच असं ठरवून सतत मुद्दाम आडवतिडव बोलतात का? कुणी काहीही म्हणो, काहीही सांगो, आपण आपले मन साफ ठेवायचे .कारण ज्याचे कर्म त्याच्याजवळ. खरतर जी लोक मन दुखावतात त्या लोकांनी थोडं सिंहावलोकन करावे आणि ज्या व्यक्तीला दोष लावतात त्या व्यक्ती भूतकाळात आपल्याशी कशी वागली, कधी आपल्या उपयोगी पडली का, याचा थोडा विचार करून दोष लावावा . ती व्यक्ती लहान असेल तर तिला मोठ्या मनाने माफ करावे आणि ती व्यक्ती मोठी असेल तर हक्काने त्या व्यक्तीकडे झाल्या गोष्टीबद्दल खुलासा करावा आणि मनावरचे मळभ दूर करून पुन्हा एकत्र आले पाहिजे. थोडं काही झालं की, आपण लगेच 'हर्ट' होतो. कुणी काहीही म्हणालं तरी आपल्या भावना लगेच दुखावतात. इतक्या का नाजूक झाल्या आहेत आपल्या भावना? येता-जाता सहज दुखावल्या जातात. एक लक्षात घ्या, अशा गोष्टी आयुष्यात होतचं राहणार आहेत. कुणी काही बोललंच तर, आपणही बोलावं..आणि तिथल्या तिथं हिशेब करून मोकळं तरी व्हावं, किंवा घडलेल्या घटनेमागचं सत्य जाणून घेण्याचा प्रयत्न तरी करावा. नाही तर ज्या कानानं ऐकलं त्याच कानानं सोडून तरी द्यावं. उगीच हर्टबिट होतं भळभळत्या जखमा कायम घेवून जगण्यात काय मज्जा... हे जीवन सुंदर आहे ते आनंदाने जगा नव्हे आंनदाने ,हसतमुख जगता आले पाहिजे, एन्जॉय करता आलं पाहिजे...!

हिरकणी सौ.अनिता गुजर डोंबिवली ८९९७५२४१९७

# आनंददायी सोहळा


PALLPUBB
For Generations

H-703 Satyesh Residency, Near Shantipura Circle
Ahmedabad, Gujarat

Reg : GJ010253523

'सातारा अजिंक्य साहित्यसंगम २०२५'
पुस्तक प्रकाशन सोहळा

मा. कवयित्री रेखा दीक्षित
'सैलानी' काव्यसंग्रह

महोदय,
हार्दिक अभिनंदन!!

आपण लिहिलेल्या "सैलानी" या शब्दांचा मुक्त विहार करणाऱ्या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा 'पलपब साहित्य प्रकाशन' या प्रख्यात संस्थेच्यावतीने आयोजित करण्यात येत आहे याचा आम्हाला विशेष आनंद होत आहे.

'पलपब साहित्य प्रकाशन' या संस्थेतर्फे राज्यात अनेक ठिकाणी साहित्य विषयक उपक्रम राबविले जातात. यामध्ये राज्यस्तरीय काव्य संमेलन, शैक्षणिक उपक्रम, पुरस्कार वितरण सोहळा, पुस्तक प्रकाशन सोहळा, साहित्य संमेलने, मराठी भाषा संवर्धन व विकासासाठी विशेष कार्यक्रम आणि इतर साहित्यिक उपक्रम आयोजित केले जातात.

११ मे २०२५ पलपब सातारा साहित्य समितीद्वारा आयोजित राज्यस्तरीय 'सातारा अजिंक्य साहित्यसंगम' संमेलनाच्या निमित्ताने 'सैलानी' या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा आयोजित केला आहे. कवयित्री रेखा दीक्षित यांचे अभिनंदन व त्यांच्या साहित्यिक वाटचालीस पलपब साहित्य परिवारातर्फे खूप खूप शुभेच्छा.

आपले पुनश्च हार्दिक अभिनंदन!!

स्थळ - स्वराज कॉन्फरन्स हॉल अँड लॉन्स रहिमतपूर रोड खोकडवाडी स्टॉप कोडोली, ता. जि. सातारा.
वेळ - सकाळी ०९.००

आपले स्नेहांकित
सौ. लीना पाटील
कार्यकारी अधिकारी (पलपब प्रकाशन, अहमदाबाद, गुजरात.)

www.pallpubb.com +91 9922168681 palllmag4@gmail.com

माझे पाचवे पुस्तक, " सैलानी "ह्या काव्यसंग्रहाचे प्रकाशन ११ मे रोजी स्वराज्य कॉन्फरन्स हॉल अँड लॉन्स रहिमतपूर रोड, खोकडवाडी स्टॉप,कोडोली,ता.जिल्हा सातारा येथे संपन्न होत आहे.
वेळ सकाळी ०९वाजता
जेष्ठ लेखिका आणि कवयित्री
रेखा दीक्षित.कोल्हापूर
९२८४०४६०२३

# अभिनेता सचिन पिळगांवकर यांचे अभिनंदन करण्यास कारण की.......

आजच्या सर्व वृत्तपत्रांमध्ये- टिव्हीवर एक मचांगलीफ बातमी प्रसिद्ध झाली आहे. आणि ती म्हणजे, अभिनयाचे प्रेम पुजारी आपल्या सर्वांचे लाडके व्यक्तिमत्त्व. आताच्या घडीला ६७ वर्षाचे जेष्ठ तरुण अभिनेता- निमर्ता- दिग्दर्शक- पटकथा लेखक आणि गायक अर्थात, ऑल राऊंडर कुटुंब प्रमुख महागुरू सचिन पिळगांवकर होत.आपणास ङ्गमास्टर दीनानाथ मंगेशकर पुरस्कारजाहीर झाल्याबद्दल, मराठी- हिंदी मायबाप प्रेक्षकांच्या वतीने मनःपूर्वक मअभिनंदन करीत आहे.आपण वयाच्या अवघ्या ५व्या वर्षी गंमत जंमत म्हणून हा माझा मार्ग एकला मराठी चित्रपटाद्वारे रुपेरी पडद्यावर पदार्पण केले. आणि आपल्या अभिनयासाठी, डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या हस्ते पहिला राष्ट्रीय बाल कलाकार पुरस्कार प्राप्त झाले. त्यानंतर आपण आत्मविश्वास ने मागे वळून न पाहता, नदिया के पार बालकलाकार म्हणून ६५ मराठी- हिंदी चित्रपटात गीत गाता चल म्हणत काम केले आहे. आणि तेव्हा पासून जो पुरस्कार चालू आहे, तो आजपर्यंत अशी ही बनवाबनवी न करता, अनेक एका पेक्षा एक आपणास पुरस्कार प्राप्त झाले आहेत. याचा आम्हाला ममराठी माणूसफ म्हणून अभिमान वाटतो आहे. आपण चित्रपट करत असताना, सत्ते पे सत्ता ची लालसा मनात न आणता, आपण तू तू मैं मैं न करता, तसेच चंदा और बिजली च्या नांदी न लागता, आपण आपले शिक्षणही पूर्ण केले. आणि चलती का नाम अंताक्षरी




खेळत असताना, आपणास तिथे बालिका वधू मसुप्रियाफदिसली. आणि आपण ब्रम्हचारी चा विचार सोडून, आंखियों के झरोखे सें आपल्या मनात लग्नासाठी कडवी खट्टी मिठी विचार आला की, नवरी मिळे नवऱ्याला. पण आपण,मजली दीदी ची मदत न घेता, १९८५ला प्रेम विवाह करून, तीने हि हा माझा नवरा नवसाचा म्हणत, माझा पती करोडपती अभिमानाने सर्वांना सांगते. त्या नंतर, आपल्या मनात आयडिया ची कल्पना आली. आणि आपण म्हणालात की, मैं बाप होगा. आणि आपल्याला एकुलती एक मुलगी मश्रियाफझाली. ती ही आपल्या पावलावर पाऊल ठेवून, चित्रपट सृष्टीत कार्यरत आहे. अशा प्रकारे अभिनयाचे आयत्या घरात घरोबा निर्माण झाले. आणि आपल्या तिघांचेही एकमेकांवर अमर प्रेम पाहून, आम्ही धन्य झालो आहोत. आपण दोघे नच बलिये मध्ये वयाच्या अवघ्या ५०व्या वर्षी, नाच स्पर्धेत आपण ङ्गनवरा बायको विजेतेङ्ग झालात. तेव्हा तर अख्खा महाराष्ट्राने मआनंदोत्सवफसाजरा केला. म्हणूनच आपण अभिमानाने शेअर करता की, आमच्या सारखे आम्हीच. आपण मराठी- हिंदी- भोजपुरी आणि कन्नड चित्रपट तसेच, दूरदर्शन व नाट्यसृष्टीत मअभिनयानेफ नाव कमविले आहे. याचा आम्हाला सार्थक मअभिमानफ वाटतो आहे. आपणास येत्या २४ एप्रिल रोजी विलेपार्ले येथे दीनानाथ मंगेशकर नाट्यगृहात मास्टर दीनानाथ मंगेशकर ८३व्या स्मृती दिनानिमित्त ङ्गलता दीनानाथ मंगेशकर पुरस्कारङ्ग सोहळ्यात वितरण करण्यात येणार आहे. तेव्हा पुन्हा एकदा आपणास महाराष्ट्राच्या वतीने मनःपूर्वक अभिनंदनऽऽऽ !!

शब्दश्री विलास देवळेकर
स्क्रीन रायटर्स असोसिएशन मुंबई- सभासद

# बहुजन समाजाला अस्तित्वाची जाणीव करुन देणारा नेता.... महादेव जी जानकर.

## ( १९ एप्रिल २०२५ वाढदिवसाच्या हार्दिक हार्दिक शुभेच्छा)





भारत कवितके मुंबई कांदिवली पश्चिम. पायाला भिंगरी बांधून फिरणारा नेता, सर्व सामान्यात मिसळणारा माणूस, कोणताही राजकीय वारसा नसलेला नेता , स्वच्छ व पारदर्शक कर्तृत्व असलेला नेता, बहुजन समाजाप्रती तळमळ असलेला नेता, पुरोगामी विचारांचा खरा वारसदार, बेधडक वक्तृत्व, निर्भिडपणा असे गुण असलेला नेता, बहुजन समाजाला आपल्या जवळचा वाटणारा माणूस म्हणजेच महादेवजी जानकर, महादेवजी जानकर यांचा जन्म १९ एप्रिल १९६८ रोजी झाला,त्यांचे वडील जगन्नाथ मारुती जानकर, अत्यंत प्रामाणिक, कणखर, चिकाटी, जिद्दी स्वभावाचे तर त्यांची आई गुणाबाई जानकर साधी राहणी, सरळमार्गी स्वभाव, मनमिळाऊ,मुलांवर चांगले संस्कार व्हावेत म्हणून सतत झटणारी, स्वतः अशिक्षित असूनही शिक्षणाचे महत्त्व जाणणारी होती, दोन भाऊ बाबा जानकर व सतिश जानकर,व एक बहिण असा महादेवजी जानकर यांचा परिवार होता,घरची परिस्थिती गरिबीची,कष्टाशिवाय पर्याय नव्हता,एक मेंढपाळाचा मुलगा एवढीच त्यांची सुरुवातीची ओळख, स्वतः इंजिनिअर असून ही त्या काळात त्यांना चांगल्या पगाराची मोठी नोकरी ही मिळाली असती,पण बहुजन समाजाला न्याय हक्कासाठी लोकशाही मार्गाने लढे देत राहिले, सोशिक समाजाला अपेक्षित सत्ता मिळवून देण्यासाठी वैचारिक व राजकीय परिवर्तनासाठी त्यांनी जीवनाचं रान केले,वाड्या वाड्यातून,खेड्या खेड्यातून,शहरा शहरातून त्यांची भटकंती चालूच होती,भूक लागेल तिथे खाणे, तहान लागेल तिथे पाणी पिणे, झोप लागेल तिथे झोपणे,अशा स्थितीत त्यांनी पुरा महाराष्ट्र पाया खालून घातला,विश्वाचा यशवंत नायक नावाचे मासिक सुरू करून बहुजन समाजाला अस्तित्वाची जाणीव करून देण्याचा प्रयत्न केला, त्यांच्या शून्यापासून नेतृत्व निर्माण करणे म्हणजे खरे तर फारच खडतर प्रवास होता, सत्ता परिवर्तनासाठी महादेव जी जानकर यांनी महत्त्वाची भूमिका पार पाडली, त्यांनी सुरू केलेल्या विश्वाचा यशवंत नायक या मासिका मार्फत वाचक समाजाला लेखक समाज बनविण्याचे काम केले,



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस मध्यंतरी एका सभेत महादेव जी जानकर बद्दल म्हणाले की," सर्व सुखाला ठोकर मारणारा, प्रचंड संघर्षातून समाजासाठी जगणारा माणूस आहे," म्हसवड च्या यात्रेवेळी त्यांनी शपथ घेतली," माझ्या प्रजा समाजाला राजा बनविणे हे माझे ध्येय असणार आहे.ते पूर्ण करण्यासाठी मी प्रयत्न करीन,माझे कोणत्याही बँकेत खाते असणार नाही,मी माझ्या घरी आईवडीलांनाही भेटायला जाणार नाही, लग्न करणार नाही," मुंबई मधील कुर्ला उपनगरांत यशवंत सेनेच्या सरसेनापती पदी त्यांची निवड झाली.त्यांच्या मनावर डॉ बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले, शाहू महाराज, यांच्या विचारांचा प्रभाव होता, परंतु सपाचे संस्थापक काशिराम यांच्या विचारांचा प्रभाव महादेव जी जानकर यांच्या वर अधिक होता, त्यांच्या मार्गदर्शनाखाली महादेव जी जानकर यांनी ३१ में २००३ मध्ये पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर जयंती निमित्त चौंडी या ठिकाणी राष्ट्रीय समाज पक्षाची स्थापना केली, त्यापूर्वी ते काशिराम यांच्या सहवासात तीन चार वर्षे फिरत होते, राष्ट्रीय समाज पक्ष स्थापना वेळी काशिराम यांनी महादेव जी जानकर यांना खूप चांगले मार्गदर्शन केले.२९ आगस्ट २००३ रोजी राष्ट्रीय समाज पक्षाला दिल्ली हून निवडणूक आयोगाने मान्यता दिली.आणि बघता बघता महादेव जानकर नावाचे झंझावात वादळ उग्र रूप धारण करू लागले.बहुजनाची चळवळ उक्ती तून नव्हे तर मुक्तीतून घडविली पाहिजे हा मनोमन विचार करीत असत.आम्ही चंद्रगुप्त मौर्य ची औलाद असून आरक्षण आम्ही भिक म्हणून मागत नाही तर तो आपला हक्क आहे.असे महादेव जी जानकर सांगत असे.८ जुलै २०१६ रोजी महादेव जी जानकर कॅबिनेट मंत्री पदाची शपथ घेताना विधान भवना बाहेर कार्यकर्त्यांनी एकच जल्लोष केला.

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com